जा.क्र.विशा/राजकीय/ /२०२६
विशेष शाखा,पिंपरी चिंचवड
दिनांक :-29/१०/२०२६

आदेश

विषय :- भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (BNSS)- २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश

ज्याअर्थी, मा.भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र .ECI/PN/118/2026 dt.22.09.2026 रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये विधान परिषद - २०२६ शिक्षक व पदवीधर मतदार संघ निवडणुका -२०२६ चा निवडणुक कार्यक्रम घोषित केले असून त्याबाबतचे पत्र मा.विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे यांचे कडुन याकार्यालयास प्राप्त झाले आहे. दि.२७.१०.२०२६ रोजी मतमोजणी श्री. शिवछत्रपती क्रिडासंकुल (स्टेडीयम) बालेवाडी म्हाळुंगे पुणे येथे निश्चित करण्यात आली आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचु नये व सार्वजनिक शांतता बिघडु नये करीता मतमोजणी परिघापासुन २०० मिटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड मला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (BNSS) चे कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिवछत्रपती क्रिडासंकुल (स्टेडीयम) बालेवाडी म्हाळुंगे पुणे येथे मतमोजणी होणार असुन येथील २०० मिटर परिसरात दिनांक २७.१०.२०२६ रोजी रात्री ००.०१ वा. पासुन ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपर्यत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१. मतमोजणीच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनाधिकृत हत्यार तसेच परवाना असलेल्या कोणत्याही प्रकारचे हत्यार घेवुन फिरण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.

सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय अंमलदारांना (पोलीस दल, संरक्षण दल ,तुरंग विभाग, बँक संरक्षण विभाग व इतर केंद्रीय राज्य शासनाच्या अधिकारी व अंमलदार यांना) लागु राहणार नाही.

२. मतमोजणीच्या परिसरात मोबाईल कॉडलेस फोन टॅब,लॅपटॉप वापण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे.(कर्तव्यावर असणा-या अधिकारी /अंमलदार यांना हा आदेश लागु राहणार नाही)
३. मतमोजणी परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.
४. मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकुर लिहण्यास अथवा छापील मजकुर प्रदर्शीत करण्यास मनाई करण्यात येत आहे.
५. मतमोजणीच्या परिसरात शासकीय वाहने तसेच ज्यांना निवडणुक आयोगाने परवानगी दिली आहे अशी वाहने विविध राजकीय पक्षाने मतमोजणी प्रतिनीधीची वाहने इत्यादी वाहने सोडुन कोणतेही प्रकारचे वाहने आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.
६. मतमोजणीचे परिसरात अधिकृत पास शिवाय आत प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.
७. मतमोजणीचा निकाल जाहीर झाल्यानंतर दि.२७/१०/२०२६ रोजी विजयी मिरवणुक काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्तीस भारतीय न्याय संहिता(BNS) २०२३ चे क.२२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्कयानिशी आज दि.29/१०/२०२६ रोजी दिला आहे.

सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- 29.१०.२०२६

(डॉ.शशिकांत महावरकर)
पोलीस सह आयुक्त,पिंपरी चिंचवड.

प्रत सविनय सादर :-

१. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई.
२. मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३. मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४. मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
५. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

प्रत :- सस्नेह अग्रेषीत :-

१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग
२. मा.आयुक्त म.न.पा.पुणे / पिंपरी चिंचवड म.न.पा.पुणे
३. मा.जिल्हा सत्र न्यायधिश, पुणे
४. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे
५. मा.सर्व निवडणूक निर्णय अधिकारी

प्रत :-

१. सर्व पोलीस उप आयुक्त, / सहा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे.
२/- या आदेशाचे स्थापनिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी करावी.
२. व्यवस्थापक येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे.
२/- या आदेशास प्रसिध्दी देण्याकरीता आणि कार्यालयाच्या भांडारामध्ये ठेवण्यासाठी प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर.